# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः19.12.2025** **वारःशुक्रवार**

---

1.विकसित भारत ग्रामीण रोजगार हमी आणि उपजीविका अभियान विधेयक संसदेत मंजूर
2.पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज अनेक आयुष उपक्रमांचा प्रारंभ होणार
3.ख्रिसमस आणि नवीन वर्षारंभ काळात रेल्वेचं देशातल्या नऊ विभागात 138 विशेष गाड्यांचं नियोजन आणि
4.सय्यद मुश्ताक अली करंडक स्पर्धा झारखंडनं पहिल्यांदाच जिंकली.

**<u>जीरामजी</u>**

विकसित भारत ग्रामीण रोजगार हमी आणि उपजीविका अभियान अर्थात विकसित भारत जी राम जी विधेयक संसदेत काल मंजूर झालं. परवा लोकसभेत मंजूर झालेल्या या विधेयकाला काल राज्यसभेचीही मंजूरी मिळाली. विकसित भारत २०४७ या उद्दीष्टपूर्तीच्या अनुषंगानं ग्रामीण विकासाचा आराखडा तयार करण्यासाठी हे विधेयक संसदेत सादर करण्यात आलं. या विधेयकानुसार आता ग्रामीण भागातील प्रत्येक कुटुंबाला १२५ दिवसांच्या रोजगाराची हमी दिली जाईल. याद्वारे त्या कुटुंबातील प्रौढ अकुशल व्यक्तींना रोजगार मिळेल. या रोजगार निधीमध्ये केंद्र सरकारचा ६० टक्के तर राज्यांचा ४० टक्के वाटा असेल. केवळ ईशान्येकडील आणि हिमालयातील राज्यांसाठी केंद्र सरकार ९० टक्के निधी देणार आहे. राष्ट्र प्रथम या तत्वानुसार केंद्र सरकार काम करत आहे. गावांचा विकास झाल्याशिवाय देशाचा विकास होऊ शकत नाही असं केंद्रिय ग्राम विकास मंत्री शिवराज सिंग चौहान या विधेयकावरील चर्चेला उत्तर देताना म्हणाले.

दरम्यान, हे विधेयक मागे घ्यावं, या मागणीसाठी काल सकाळी विरोधी पक्ष सदस्यांनी संसद भवन परिसरात निदर्शनं केली. राष्ट्रपिता महात्मा गांधीजींचं नाव पुसण्याचा प्रयत्न सरकार करत आहे, असा आरोप विरोधी पक्षाकडून करण्यात आला.

**<u>राष्ट्रपती-दौपदी-मुर्मू-</u>**

देशभरातील लोकसेवा आयोगातील अध्यक्षांच्या दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेचं, राष्ट्रपती दौपदी मुर्मू यांच्या हस्ते आज हैद्राबाद इथं उद्घाटन होणार आहे. आयोगाच्या अध्यक्षांबरोबरच वरिष्ठ अधिकारी या परिषदेत सहभागी होतील. केंद्रिय लोकसेवा आयोग आणि राज्य लोकसेवा आयोगाकडून राबवण्यात येणाऱ्या प्रशासकीय सेवा भरती प्रक्रियेत येणाऱ्या अडचणी आणि आव्हानांबाबत यावेळी चर्चा होण्याची

अपेक्षा आहे. तेलंगणाचे राज्यपाल जीश्नु देव वर्मा, मुख्यमंत्री रेवंत रेड्डी आणि UPSC चे अध्यक्ष अजय कुमारही यावेळी उपस्थित राहणार आहेत.

**<u>पंतप्रधानहूसमिट</u>**

पारंपरिक औषधशास्त्रावर नवी दिल्लीत सुरू असलेल्या जागतिक आरोग्य संघटनेच्या आंतरराष्ट्रीय शिखर परिषदेचा आज समारोप होणार आहे. या समारोप समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते अनेक आयुष उपक्रमांचा प्रारंभ केला जाणार आहे. माय आयुष सर्वसमावेशक सेवा पोर्टल, आयुष मार्क या प्रमाणिकरणाचा यामधे समावेश आहे.
जागतिक आरोग्य संघटनेच्या योग प्रशिक्षण विषयावरील तांत्रिक अहवालाचं आणि फ्रॉम रूटस टू ग्लोबल रीच – इलेवन इयर्स ऑफ ट्रान्सफॉर्मेशन इन आयु, या पुस्तकाचं प्रकाशन या कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते होणार आहे. तसंच २०२१ ते २०२५ या काळात योग प्रसार आणि विकासामध्ये उल्लेखनीय काम केलेल्या व्यक्तींना पंतप्रधानांच्या हस्ते पुरस्कार दिला जाणार आहे.

जागतिक आरोग्य संघटना आणि आयुष मंत्रालयानं आयोजित केलेल्या या शिखर परिषदेत जागतिक नेते, धोरणकर्ते, वैज्ञानिक, वैद्यकीय व्यावसायिक आणि समाजातील अन्य मान्यवरांनी समान, शाश्वत आणि पुराव्यावर आधारित आरोग्य प्रणालीच्या विकासाबाबत चर्चा केली.

**<u>मोदी</u>**

भारत आणि ओमान यांच्या दरम्यान काल सर्वसमावेशक आर्थिक भागीदारी करार करण्यात आला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या ओमान भेटीदरम्यान वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल आणि ओमानमधील समपदस्थ मंत्र्यांनी मस्कत इथं यावर स्वाक्षरी केली. दोन्ही देशांमध्ये शिक्षण, सागरी व्यापार, कृषी क्षेत्राशी संबंधित विविध सामंजस्य करारही करण्यात आले. भारत आणि ओमान यांच्यातील बंध जुने असल्याचं मोदी यावेळी म्हणाले.

भारत ओमान यांच्यातील दृढ संबंधांचं प्रतिक म्हणून ओमानचे सुलतान हैथम बिन तारिक यांनी मोदी यांना “ऑर्डर ऑफ  ओमान” हा सर्वोच्च नागरी सन्मान प्रदान केला. तीन देशांचा दौरा आटोपून पंतप्रधान मोदी काल मायदेशी परतले.

**<u>पंतप्रधानशांतीविधेयक</u>**

भारताच्या विकासासाठी अणुउर्जेचा शाश्वत वापर आणि प्रगती विधेयक अर्थात शांती विधेयक काल संसदेत मंजूर झालं. भारताच्या तंत्रज्ञान विश्वातला हा क्रांतीकारी क्षण असल्याचं म्हणत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्याचं स्वागत केलं आहे. या विधेयकामुळे कृत्रिम बुद्धीमत्तेला बळ मिळेल, हरित उत्पादकतेला चालना मिळेल आणि भविष्यात स्वच्छ उर्जानिर्मितीला निर्णायक वेग येईल असं मोदींनी समाज

माध्यमावरील संदेशात म्हटलं आहे. गुंतवणूक, नवसंशोधन आणि राष्ट्र उभारणीची हीच योग्य वेळ असल्याचं त्यांनी नमूद केलं आहे.

**<u>रेल्वेविशेषगाड्या</u>**

आगामी ख्रिसमस आणि नवीन वर्षाच्या काळात होणारी प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेऊन देशातल्या नऊ विभागात 138 विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचा निर्णय भारतीय रेल्वेनं घेतला आहे. या गाड्यांच्या एकंदर 650 फेऱ्या होणार असून यातील 244 फेऱ्यांबाबतची सूचना जारी करण्यात आली आहे. ख्रिसमस आणि नवीन वर्ष प्रवाशांना विनासायास साजरं करता यावं यासाठी या विशेष गाड्यांद्वारे अतिरिक्त क्षमता, सुविधा आणि सेवा पुरवण्याचा प्रयत्न असल्याचं रेल्वे विभागानं म्हटलं आहे.

**<u>राम-सुतार</u>**

ज्येष्ठ शिल्पकार राम सुतार यांच्या पार्थिव देहावर काल उत्तर प्रदेशातल्या नोएडा इथं शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. राम सुतार यांचं काल दिल्लीत वृद्धापकाळानं निधन झालं. ते 100 वर्षांचे होते.

'स्टॅच्यू ऑफ युनिटी' या जगातील सर्वात उंच पुतळ्याचं आरेखन सुतार यांनी केलं होतं. याखेरीज अनेक थोर व्यक्तींचे, त्यांच्या व्यक्तिमत्वाचे बारकावे दाखवणारे पुतळे सुतार यांनी उभारले होते. पद्मश्री, पद्मभूषण, टागोर सांस्कृतिक पुरस्कार यासारखे अनेक सन्मान त्यांना प्राप्त झाले होते. गेल्याच महिन्यात त्यांना महाराष्ट्र भूषण पुरस्कारानं गौरवण्यात आलं होतं.

**<u>बांग्लादेश</u>**

बांग्लादेशमध्ये चिट्टोग्राम इथं काल रात्री भारतीय सहाय्यक उच्चायुक्तांच्या निवासस्थानाजवळ काही आंदोलकांनी जोरदार निदर्शनं करत दगडफेक केली. यामुळे नव्याने तणावाचं वातावरण निर्माण झालं आहे, रात्रभर सुरक्षेच्या कारणास्तव दूतावासाच्या परिसरात शंभरपेक्षा अधिक पोलीस कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत.

बांग्लादेशमधील विद्यार्थी नेता उस्मान हादीचा सिंगापूरमध्ये उपचारादरम्यान काल  मृत्यू झाला. त्याच्या निधनाची बातमी आल्यानंतर बांग्लादेशात आंदोलकांनी निदर्शनं केली.

**<u>अटक</u>**

गेल्या महिन्यात झालेल्या दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणातील आणखी एका प्रमुख आरोपीला राष्ट्रीय तपास संस्थेनं काल अटक केली आहे. जम्मू काश्मीरमधल्या शोपियाँ इथला रहिवासी असलेल्या यासीर अहमद दर याला एनआयएनं नवी दिल्लीतून ताब्यात घेतलं. दिल्ली बॉम्बस्फोट प्रकरणी अटक करण्यात आलेला हा नववा आरोपी आहे.

**<u>क्रिकेट</u>**

सय्यद मुश्ताक अली करंडक स्पर्धेच्या अंतिम सामन्यात विजय मिळवत झारखंडच्या संघानं पहिल्यांदाच ही स्पर्धा जिंकली. काल पुण्यात झालेल्या सामन्यात प्रथम फलंदाजी करताना झारखंडनं 20 षटकांत 262 धावा केल्या. कर्णधार इशान किशननं 49 चेंडूत 101 धावा केल्या. प्रतिस्पर्धी हरियाणाच्या संघांचे सर्व फलंदाज 193 धावांवर बाद झाले. इशान किशननं या स्पर्धेत सर्वाधिक 517 धावा केल्या.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि दक्षिण अफ्रिकेच्या संघांदरम्यान वीस षटकांच्या क्रिक्रेट सामन्यांच्या मालिकेतला अंतिम सामना आज अहमदाबाद इथं होणार आहे. सूर्यकुमार यादवच्या नेतृत्वातील भारतीय संघ मालिकेत दोन सामने जिंकून आघाडीवर आहे. आजचा सामना जिंकून निर्णायक यश मिळवण्याचा भारतीय संघाचा प्रयत्न असेल. लखनऊ इथला चौथा सामना दाट धुक्यामुळे रद्द करावा लागला होता.

**<u>हवामान</u>**

उत्तर प्रदेश आणि उत्तराखंडमध्ये आज थंडीची लाट येण्याची शक्यता आहे. बिहार, उत्तर प्रदेश, पंजाब, हरियाणा, चंदीगड आणि उत्तराखंडमध्ये दाट धुकं असेल. ईशान्येकडील राज्यांसह झारखंड आणि त्रिपुरामध्येही दाट धुक्याची शक्यता असल्याचं हवामान विभागानं म्हटलं आहे.

दरम्यान, राजधानी दिल्लीतील हवेची गुणवत्ता अजूनही खराबच आहे. आज सकाळी दिल्लीत हवेचा गुणवत्ता निर्देशांक 387 नोंदवला गेला.

## **याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.**

## **नमस्कार.**